# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक: 29.08.2025** **वार:शुक्रवार**

---

1. शक्तीपीठ महामार्गाचा कोल्हापूर जिल्ह्यातला नियोजित आराखडा राज्य सरकारकडून रद्द, पवनार ते सांगली दरम्यानच्या आखणीला मान्यता
2. मराठा आणि ओबीसी या दोन्ही समाजाचे प्रश्न सोडवणार- मुख्यमंत्र्यांचा पुनरुच्चार
3. चंद्रपूर जिल्ह्यात राजुरा-गडचांदूर मार्गावर अपघातात सहा जणांचा मृत्यू; दोनजण गंभीर जखमी आणि
4. राज्याच्या अनेक भागात पावसाची पुन्हा जोरदार हजेरी; शेतीचं, घरांचं मोठं नुकसान

**<u>शक्तिपीठ</u>**

वर्धा जिल्ह्यातील पवनार ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रादेवी दरम्यानच्या; शक्तीपीठ महामार्गाच्या पवनार ते सांगली या आखणीला; आणि त्यासाठीच्या भूसंपादनाला राज्य सरकारनं प्रशासकीय मान्यता दिली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागानं काल यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. यात मूळ मंजूर आखणीपैकी कोल्हापूर जिल्ह्यातील आखणीची यापूर्वी काढलेली अधिसूचना रद्द करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील आखणीचे सर्व उपलब्ध आणि संभाव्य पर्याय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला देण्यात आले आहेत. या पर्यायांबाबत कोल्हापुरातले मंत्री आणि लोकप्रतिनिधींशी चर्चा करुन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अंतिम निर्णय घेणार आहेत. महाराष्ट्र शक्तीपीठ हा प्रस्तावित महामार्ग 12 जिल्ह्यातील 39 तालुके आणि 370 गावातून जाणार आहे. या महामार्गामुळे तुळजापूर, कोल्हापूर, माहूर यांसह 18 धार्मिक स्थळ जोडली जाणार आहेत. सुमारे 802 किलोमीटर लांबीच्या या महामार्गामुळं नागपूर-गोवा हा 18 तासांचा प्रवास 8 तासात होण्याची शक्यता आहे.

**<u>मुख्यमंत्री</u>**

मराठा किंवा ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही, दोन्ही समाजाचे प्रश्न शासन सोडवेल, असा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. याबाबत काल मुंबईत माध्यमांशी बोलताना ते म्हणाले....

**दोन्ही समाजाला माझी विनंती आहे की शासन दोन्ही समाजाच्या हिताचा विचार करेल कुठल्याही समाजाला दुसऱ्या समाजासमोर आणण्याचा शासनाचा हेतू नाही त्यामुळे कोणावर अन्याय करून कोणाला देण्याचा प्रश्न नाही आहे दोघांचेही प्रश्न आम्ही सोडवणार आहोत त्यामुळे ओबीसी समाजानेही हे लक्षात ठेवावं की कुठेही त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही. आणि मराठा समाजाने हे लक्षात घ्यावं की आम्हीच सोडवलेत सगळे प्रश्न दुसऱ्या कोणी सोडवलेत. सांगावं कोणी सोडवलेले आहेत. मराठा समाजाचे प्रश्न आमच्या सरकार शिवाय. म्हणजे मी मुख्यमंत्री असताना शिंदेजी मुख्यमंत्री असताना तेव्हाच सुटले आहेत. बाकी कधी सुटले प्रश्न आणि आम्हीच सोडवणार आहोत.**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात अंतरवाली सराटीतून निघालेली यात्रा काल शिवनेरीवर पोहचली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळाचं दर्शन घेऊन आंदोलक मुंबईकडे रवाना झाले. दरम्यान मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्यासाठी 50 टक्क्यांची मर्यादा हटवण्याची मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुंबईत केली.

**गणेश विसर्जन**

मुंबई पुण्यासह राज्यात सर्वत्र काल दीड दिवसांच्या घरगुती गणरायांचं भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आलं. पुणे महापालिकेनं कृत्रिम हौद आणि लोखंडी टाक्यांमध्ये विसर्जनाची सोय केली होती. निर्माल्य कलशांची व्यवस्था आणि मूर्तीदान केंद्रंही उभारण्यात आली होती. पिंपरी चिंचवड महापालिकेनं 90 ठिकाणी विसर्जनाची सुविधा उपलब्ध करून दिली होती. या सर्व ठिकाणी अग्निशमन पथकं, सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले होते.

**श्रीगणेशा आरोग्याचा**

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षानं 'श्री गणेशा आरोग्याचा' हा उपक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत संपूर्ण राज्यात मोफत आरोग्य तपासणी शिबिरं आयोजित केली जात आहेत. अनेक गणेश मंडळ या उपक्रमात सक्रिय सहभागी झाली आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात आलेल्या शिबिरांमध्ये नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येत आहे.

**गोमय गणेश-गोंदिया**

गोंदिया जिल्ह्यातील लक्ष्मी गोशाळेच्या संचालिका प्रिती टेंभरे यांनी गाईच्या शेणापासून गणेशाची मूर्ती तयार करून त्याची प्राणप्रतिष्ठा केली आहे. याबाबत बोलताना प्रीती टेंभरे म्हणाल्या....

**गायीच्या शेणाच्यापासनं ही बनलेली मूर्ती आहे, तर याच्यापासनं असं आहे की, पर्यावरणपूरक तर ही आहेच जर आपण प्रत्येक घरी जर गोमय गणपतीची स्थापना केली मूर्तीची तर, गाईचं कत्तलखान्यात जाणं ते बंद होईल पर्यावरणामध्ये जे नदी तलाव याच्यामध्ये विसर्जन करतात पीओपी गणपतीचे तर त्यामुळे जे पाणी दूषित होतं आणि तिथले जे जलप्राणी आहेत ते दगावतात तर गोमय गणपतीचे विसर्जन करू तर तिथल्या जे प्राणी आहेत त्यांना हे खाद्य म्हणून वापर होतो शेणाचा आणि जर आपण तेच विसर्जन घरी आपण एखाद्या पॉंडमध्ये केलं किंवा कुंडीमध्ये केलं तर त्याचं जे पाणी आहे आणि त्याच्यात सीड गणपती पण आम्ही तयार करतो गोशाळेमध्ये त्याच्यामध्ये आपण काही सीड्स टाकलेले आहेत. ते सीड्स जेव्हा आपण विसर्जन करू घरी तर गणपती बाप्पा नवीन वृक्षाच्या रूपामध्ये तुमच्याच घरी ते स्थापित होतात.**

**रथोत्सव-सांगली**

सांगली जिल्ह्यात तासगाव इथं श्री गणपती पंचायतन देवस्थानचा 246वा रथोत्सव काल हजारो गणेशभक्तांच्या उपस्थितीत पार पडला. या रथोत्सवाची सुरुवात 1779 मध्ये संस्थापक श्रीमंत परशुरामभाऊ पटवर्धन यांनी केली होती. हा रथ गणपती मंदिरापासून काशी विश्वेश्वर मंदिरापर्यंत भाविक ओढत घेऊन जातात.

**गजानन महाराज-बुलडाणा**

शेगाव इथं संत गजानन महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव काल अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. उत्सव काळात विविध धार्मिक, आध्यात्मिक कार्यक्रम झाले.

**जनधन**

प्रधानमंत्री जन धन योजनेला काल 11 वर्षे पूर्ण झाली. आतापर्यंत या योजनेची 56 कोटींहून अधिक खाती उघडण्यात आली आहेत. या योजनेबाबत अकोल्याचे सागर मापारी या लाभार्थींची ही प्रतिक्रिया....

**आम्हाला केंद्र सरकारकडून शून्य रुपयात एक रुपयाने भरता आम्ही जनतेचे खाते उघडले त्या खात्याचा फायदा अस प्रत्येक योजनेचे पैसे वेळेवर येतात सोबतच त्याला केंद्र सरकारचं दोन लाखाचं विमा सुरक्षा कवच आहे त्याच्यानंतर**

**कोरोना काळात आम्हाला खूप फायद्याचं ठरलं त्यात पाच पाचशे रुपये हे आम्हाला कोरोना काळात आले त्यामुळे आम्हाला खरंच खूप ते कामी आले त्यामुळे आम्ही केंद्र सरकारचे खूप खूप मनापासून आभारी आहोत.**

**दुर्घटना- पालघर**

विरारमध्ये इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत 17 जणांचा मृत्यू झाला असून 9 जण जखमी झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. या इमारतीला मे महिन्यात स्ट्रक्चरल ऑडिटची नोटीस दिली होती, मात्र लोकांनी ते गांभीर्यानं घेतलं नाही, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**अपघात-चंद्रपूर**

चंद्रपूर जिल्ह्यातील कापणगाव जवळ राष्ट्रीय महामार्गावर काल झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला; तर दोघे गंभीर जखमी झाले. राजुराहून खामोनाकडे जाणाऱ्या रिक्षाला ट्रकने जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला.

**बाळ कर्वे निधन**

ज्येष्ठ अभिनेते दिग्दर्शक बाळ कर्वे यांचं काल मुंबईत वार्धक्यानं निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. 'चिमणराव-गुंड्याभाऊ' मालिकेत त्यांनी वठवलेली गुंड्याभाऊंची भूमिका अद्याप रसिकांच्या स्मरणात आहे. 'जैत रे जैत' 'लपंडाव', 'चटक चांदणी' अशा चित्रपटांमधून तर 'रथचक्र', 'आई रिटायर होतेय', 'कुसुम मनोहर लेले', 'शांतता कोर्ट चालू आहे', 'सूर्याची पिल्ले' अशा नाटकांमधूनही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. सई परांजपे दिग्दर्शित 'कथा' या हिंदी चित्रपटातही कर्वे यांनी काम केलं होतं.

**क्रीडा दिन**

राज्य शासनाच्या शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागातर्फे आज पुण्यात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्यांना गौरवण्यात येणार आहे. म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात हा समारंभ होईल.

**पूर-पाऊस**

राज्याच्या विविध भागात काल पावसानं जोरदार हजेरी लावली. प्रामुख्यानं मराठवाड्यातील काही जिल्ह्यात या पावसानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. लातूर जिल्ह्यात पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आज शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ऐकुया याबाबचा सविस्तर वृत्तांत....

**बीड जिल्ह्यात धारूर तालुक्यात जोरदार पावसामुळे वाण नदीला पूर आला. आडस-अंबाजोगाई रस्त्यावरच्या पुलावर पाणी येऊन दोन वाहनं वाहून गेली असून दोघांचा मृत्यू झाला आहे. नांदेड जिल्ह्यात पूरपरिस्थिती गंभीर झाली असून देगलूर तालुक्यातील 2 हजार 236 नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची एक तुकडीही देगलूर तालुक्यात तैनात करण्यात आली आहे. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील काही गावांमध्ये पाणी शिरलं आहे.**

**लातूर जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ आणि अहमदपूर तालुक्यात पुरात अडकलेल्या दहा जणांची स्थानिक आपत्ती व्यवस्थापन पथक आणि नागरिकांनी सुटका केली. खबरदारीचा उपाय म्हणून लष्कराच्या एका पथकाला पाचारण करण्यात आलं आहे. हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ तालुक्यातील सिद्धेश्वर धरणामध्ये पाण्याची आवक वाढली असून धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी पूर्णा नदी पात्रात सोडण्यात येत आहे.**

धाराशिव जिल्ह्यात गेल्या काही दिवसात अनेक महसूल मंडळांत अतिवृष्टी झाल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील मासोळी मध्यम प्रकल्पाच्या पाणी साठ्यात वाढ झाल्यामुळे नदीपात्रात विसर्ग केला जाण्याची शक्यता आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात काल झालेल्या जोरदार पावसाने शेतीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. नंदुरबार जिल्ह्यातल्या नवापूर शहराला जोरदार पावसानं झोडपलं असून अनेक घरात पाणी शिरलं आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात काल पावसाचा जोर कायम होता; संततधार पावसाने नद्या, ओढे दुथडी भरून वाहत आहेत.

नाशिक शहरासह जिल्ह्यात गेले काही दिवस मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरु आहे; गंगापूर धरणातून विसर्ग मात्र काल कमी करण्यात आला आहे. पुणे आणि परिसरातही काल रात्री पावसानं जोरदार हजेरी लावली. ऐन गणेशोत्सवात झालेल्या या पावसामुळे देखावे पाहण्यासाठी आलेल्या नागरिकांची चांगलीच तारांबळ झाली. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठिकठीकाणच्या बातमीदारांसह योगेश रांगणेकर, पुणे.

**हवामान**

राज्याच्या सर्वच विभागात आज बहुतांश ठिकाणी पावसाचा अंदाज असून तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.